**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**- घोषणा -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक 08 जुलै, 2018 **रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट – अ व ब संयुक्त (पूर्व) परीक्षा - 2018** या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर परीक्षेमधील आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना आकृत्या/नकाशांवर आधारित असलेल्या प्रश्नांमध्ये खालील विवरणपत्रात नमूद प्रश्नांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| **संच A** | **संच B** | **संच C** | **संच D** |
|---|---|---|---|
| 75 | 61 | 51 | 41 |

**प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी उमेदवारांना हरकती / अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्विकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती / अभिवेदने विहित नमुन्यात परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दिनांक 17 जुलै,** 2018 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच / अभिवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती / अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 10 **जुलै**, 2018
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई